04-06-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03-06-2025 21:20 Page 1



## निवडक




**वागातोर : समाजसेवक शिवशंकर मयेकर यांच्या हस्ते तिरोडकरला सामनावीराचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

### सिकेरी स्पोर्ट्स क्लब विजयी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**शिवोली, दि. ३ :** सिकेरी स्पोर्ट्स क्लबने फातोर्डाच्या डॉन बॉस्को ओरेटरी क्लबचा ४-२ अशा गोल फरकाने पराभव करून वागातोर पॅरीश यूथ स्पोर्ट्स क्लबने आयोजित केलेल्या २४व्या वागातोर चषक आंतरग्राम फुटबॉल स्पर्धेतील शुभारंभी लढतीत विजय मिळविला.

वागातोर फुटबॉल मैदानावर या स्पर्धेतील लढती खेळविण्यात येणार आहेत. विजयी डॉन बॉस्को ओरेटरी क्लबसाठी वॅलिटो क्रूझ व रिची वाझने गोल केले तर सिकेरी स्पोर्ट्स क्लबसाठी साईमेश गावकरने दोन तर प्रतीक तिरोडकर व बदली खेळाडू क्रिश नारोजीने सिकेरी स्पोर्ट्स क्लबसाठी प्रत्येकी एक गोल केला. सिकेरी स्पोर्ट्स क्लबच्या प्रतीक तिरोडकरला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

समाजसेवक शिवशंकर मयेकर यांच्या हस्ते तिरोडकरला सामनावीराचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी हणजूण पंचायत सदस्य दिनेश पाटील, सुदेश पार्सेकर, सुरेंद्र गोवेकर, फादर मार्सेलिनो, जीएफएचे सदस्य बाबली मांजरेकर उपस्थित होते.

# आयपीएल -२०२५ अंतिम सामना : पंजाबचा प्रथम गोलंदाजीचा निर्णय

## ख्रिस गेलची उपस्थिती ठरली चर्चेचा विषय | आरसीबीची संथ सुरुवात

**अहमदाबाद, दि. ३ :**

आयपीएल २०२५ च्या अंतिम फेरीत पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आमनेसामने आले असताना नाणेफेक जिंकून पंजाब किंग्जचा कर्णधार श्रेयस अय्यरने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या हंगामातील दोन्ही संघांचा हा चौथा सामना आहे. यापूर्वी झालेल्या क्वालिफायर १ मध्ये आरसीबी ने पंजाबचा सहज पराभव केला होता.

या पराभवाची भरपाई करण्यासाठी अय्यरच्या संघाने एलिमिनेटरमध्ये मुंबई इंडियन्सचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. विशेषतः, अय्यरने त्या सामन्यात नाबाद ८७ धावांची महत्वपूर्ण खेळी करत संघाला निर्णायक विजय मिळवून दिला होता. दुसरीकडे, आरसीबी कर्णधार रजत पाटीदार अंतिम अडथळा पार करत विजेतेपद मिळवण्यासाठी सज्ज होता. सामन्याच्या सुरुवातीलाच काइल जेमिसनने पाटीदारचा बळी घेत आरसीबी ला धक्का दिला.

**ताकदवान फलंदाजी आणि संयमित गोलंदाजी**

दोन्ही संघांमध्ये आक्रमक फलंदाजांची उपस्थिती असली तरी आरसीबी अजूनही टिम डेव्हिडच्या फिटनेसबाबत साशंक आहे. पंजाबच्या संघात हरप्रीत ब्रारचा समावेश करण्यात आला असून युझवेंद्र चहलला वगळण्यात आले आहे. चहलने एलिमिनेटरमध्ये मुंबईविरुद्ध उत्कृष्ट कामगिरी केली होती, मात्र संघाने ब्रारवर विश्वास दाखवला.

**ख्रिस गेलची उपस्थिती ठरली चर्चेचा विषय**

'युनिव्हर्स बॉस' ख्रिस गेल सामन्याच्या वेळी स्टेडियममध्ये उपस्थित होता. आरसीबीची जर्सी आणि पंजाबची पारंपरिक लाल पगडी परिधान करून उभा असलेल्या गेलच्या समर्थनाबाबत अनेक तर्क-वितर्क लावले जात होते. गेलने २०११ ते २०१७ दरम्यान आरसीबी कडून खेळताना अनेक संस्मरणीय खेळी केल्या होत्या. त्यानंतर २०१८ ते २०२१ या कालावधीत तो पंजाब किंग्जचा भाग होता.




मी जरी जमैकाचा असलो तरी भारत माझ्या हृदयाजवळ आहे. मी दोन्ही संघांचे प्रतिनिधित्व करतो आणि मला दोघांचाही अभिमान आहे. आजचा सामना भन्नाट होणार आहे, असे वक्तव्य गेलने सामन्यापूर्वी आरसीबी च्या सोशल मीडियावर दिले.

**संथ सुरुवात, संयमी फलंदाजी**

आरसीबी च्या डावाची सुरुवात संयमी झाली. पहिल्या षटकात फिल सॉल्टने अर्शदीपवर १२ धावा काढत आक्रमणाची सुरुवात केली, मात्र दुसऱ्या षटकात काइल जेमिसनने त्याला माघारी धाडले. मयंक अगरवालने तिसऱ्या क्रमांकावर येत षटकार मारला, पण त्यालाही मोठी खेळी करता आली नाही. २४ धावा करून तो चहलच्या गोलंदाजीवर बाद झाला.

कर्णधार पाटीदारही फार काळ टिकला नाही. विजयकुमार वैशाखच्या हार्ड लेंथ चेंडूवर त्याचा ऑफ-स्टंप उडाला. कोहलीने मात्र आपली पारंपरिक अँकर भूमिका पार पाडत खेळाची घडी सांभाळली. पॉवरप्लेमध्ये कोहलीने केवळ १० चेंडू खेळले, तर संघाने पहिल्या सहा षटकांत ५५ धावा केल्या.

गोलंदाजांकडून दमदार कामगिरी

पंजाब किंग्जच्या अर्शदीप आणि जेमिसन यांनी अचूक टप्प्यावर मारा करत सुरुवातीला आरसीबी च्या फलंदाजांना अडचणीत टाकले. जेमिसनच्या लांबीवर नियंत्रणात असलेल्या चेंडूंनी पाटीदारसारख्या फलंदाजाला देखील मर्यादेत ठेवले.दोन्ही संघांमध्ये असलेल्या स्टार खेळाडूंमुळे सामना रंगतदार ठरला आहे.

**प्लेइंग इलेव्हन :**

**रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू:** फिलिप सॉल्ट, विराट कोहली, मयंक अगरवाल, रजत पाटीदार (कर्णधार), लियाम लिव्हिंगस्टोन, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), रोमारियो शेफर्ड, कृणाल पंड्या, भुवनेश्वर कुमार, यश दयाल, जोश हेझलवूड.

**पंजाब किंग्ज:** प्रियांश आर्य, जोश इंग्लिस (यष्टीरक्षक), श्रेयस अय्यर (कर्णधार), नेहल वधेरा, शशांक सिंग, मार्कस स्टोइनिस, अझमतुल्लाह उमरझाई, काइल जेमिसन, विजयकुमार वैशाख, अर्शदीप सिंग, हरप्रीत ब्रार.

# श्रेयस-हार्दिकवर बीसीसीआयची कारवाई!



**नवी दिल्ली. दि. ३ :**

आयपीएल २०२५मध्ये काल रात्री पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यात क्वालिफायर-२ खेळवण्यात आला. हा सामना जिंकून पंजाब किंग्जने अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. आता पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यातील सामना अंतिम फेरीत पाहायला मिळेल. क्वालिफायर-२ नंतर बीसीसीआयने पंजाब आणि मुंबई दोन्ही संघांच्या कर्णधारांवर कारवाई केली आहे. क्वालिफायर-२ मध्ये चूक केल्याबद्दल आता दोन्ही कर्णधारांना शिक्षा झाली आहे.

**क्वालिफायर २ मधील ही चूक पडली महागात**

पावसामुळे क्वालिफायर-२ उशिरा सुरू झाला, जरी सामना २ तासांनी वाढवण्यात आला. त्याच वेळी, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) या सामन्यात स्लो ओव्हर-रेटसाठी श्रेयस अय्यर आणि हार्दिक पंड्या या दोन्ही कर्णधारांना मोठा दंड ठोठावला. पावसामुळे सामना व्यत्यय आणल्यानंतर हा दंड ठोठावण्यात आला.

या हंगामात पंजाब किंग्जला दुसऱ्यांदा स्लो ओव्हर रेटसाठी दोषी आढळले आहे. त्यामुळे कर्णधार अय्यरला २४ लाख रुपये आणि इम्पॅक्ट प्लेअर आणि संघातील इतर खेळाडूंना प्रत्येकी ६ लाख रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. याशिवाय, मुंबई इंडियन्सला या हंगामात तिसऱ्यांदा स्लो ओव्हर रेटसाठी दोषी आढळले आहे, ज्यामुळे कर्णधार हार्दिक पंड्याला ३० लाख रुपये आणि संघातील इतर खेळाडूंना प्रत्येकी १२ लाख रुपये दंड ठोठावण्यात आला आहे.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने २० षटकांत ६ गडी गमावून २०३ धावा केल्या, परंतु मुंबईच्या गोलंदाजांना हे लक्ष्य वाचवता आले नाही. त्यानंतर पंजाब किंग्जने आक्रमक फलंदाजी करताना हा सामना १९ षटकांत संपवला. पंजाब किंग्जचा कर्णधार श्रेयस अय्यरने ८७ धावांची नाबाद खेळी करत संघाला विजय मिळवून दिला. आता ११ वर्षांनंतर पंजाब किंग्ज आयपीएलच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे, अय्यरकडे आता पहिल्यांदाच पंजाब किंग्जला जेतेपद मिळवून देण्याची सुवर्णसंधी आहे.

# मयंक यादवसाठी बीसीसीआयचा मोठा निर्णयी; क्रिकेटपासून विश्रांती

**नवी दिल्ली, दि. ३ :**

गेल्या काही वर्षांत भारताला उमरान मलिक आणि मयंक यादव हे दोन खरे वेगवान गोलंदाज मिळाले, पण आज त्या दोघांची स्थिती काय आहे हे क्रिकेटप्रेमींना सांगण्याची गरज नाही. उमरान मलिक तंदुरुस्त असूनही तो गायब आहे, नवीन वेगवान गोलंदाज मयंक यादव नियमित अंतराने दुखापतींमुळे मैदानाबाहेर आहे. या हंगामातही मयंकने फक्त दोन सामने खेळले आहेत. तथापि, यादवबद्दलची ताजी बातमी अशी आहे की आता त्याने दुखापतीतून सावरण्यासाठी बुमराह मार्ग' अवलंबण्याचा निर्णय घेतला आहे

वृत्तानुसार, मयंक त्याच्या दुखापतीबद्दल तज्ञांचा सल्ला घेण्यासाठी न्यूझीलंडला जाणार आहे. सेंटर ऑफ एक्सलन्स च्या वैद्यकीय पथकाशी चर्चा केल्यानंतर बीसीसीआयने हा निर्णय घेतला. मयंक यादवला नियमित अंतराने दुखापत होण्यापासून रोखणे आणि पुन्हा एकदा त्याचा १४५किमी/ताशी वेग गाठणे, ज्यामुळे त्याने संपूर्ण क्रिकेट जगताला वेड लावले होते, हे बोर्डाचे उद्दिष्ट आहे.

मयंकबाबतची ताजी बातमी अशी आहे की हा गोलंदाज पुन्हा बराच काळ सक्रिय क्रिकेटपासून दूर राहू शकतो. आणि अनेक महत्त्वाच्या मालिका त्याच्या हातून निसटू शकतात. पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकात खेळण्याचे मयंकचे स्वप्न स्वप्नच राहण्याची शक्यता आहे. मयंकने २०२४ मध्ये बांगलादेशविरुद्ध आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. त्यानंतर त्याने त्या मालिकेत चार विकेट घेतल्या.





# पीएसजीची फुटबॉल स्पर्धेच्या अजिंक्यपदावर मोहर

**नवी दिल्ली, दि. ३ :**

▶ **इंटर मिलानचा ५-० ने धुव्वा**

▶ **डेसिरे डुएचा दमदार खेळ**

लुईस एनरिक यांच्या मार्गदर्शनात पॅरिस सेंट जर्मेन (पीएसजी) क्लबने शनिवारी मध्यरात्री फुटबॉलच्या रणांगणात ऐतिहासिक कामगिरी केली. फ्रान्सच्या पीएसजी क्बबने इटलीच्या इंटर मिलान क्लबचा ५०० असा धव्वा उडवत पहिल्यांदाच चॅम्पियन्स लीग या प्रतिष्ठेच्या फुटबॉल स्पर्धेच्या अजिंक्यपदावर मोहर उमटवली.

याआधी २०११-२०मध्ये बायर्न म्युनिच संघाकडून पराभूत झाल्यामुळे पीएसजी क्लबला चॅम्पियन्स लीग स्पर्धेत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. यंदा मात्र विजेपदाला गवसणी घाण्याचे स्पप्न पूर्ण केले २०२३ नंदर इंटर मिलान क्लबला पुन्हा उपविजेतेपदच मिळाले.

१९ वर्षीय डेसिरे हुए याने पीएसजीच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. पीएसजीने केलेल्या पाच पैकी दोन गोल त्याने केले. चॅम्पियन्स लीगच्या अंतिम फेरीत गोल करणारा तो तिसरा खेळाडू ठरला. डुएचे सध्याचे वय १९ वर्षेव ३६२ दिवस आहे. याआधी एजाक्स क्लबसाठी पॅट्रिक क्लूवर्ट याने व पोर्टो क्लबसाठी कार्लोस अ‍ॅल्बर्टो याने कमी वयामध्ये गोल करताना दमदार कामगिरी केली होती.

पीएसजी इंटर मिलान या दोन क्लबमध्ये अटीतटीची झुंज रंगेल, अशी अपेक्षा होती. मात्री लुईस एनरिक यांच्या योजना यशस्वी ठरल्या. त्यांच्या भेदक चालींसमोर इंटर मिलान क्लबचा निभाव लागला नाही. इंटर मिलान क्लब बचावात्मक खेळावर जोर देणार, हे एनरिक यांना माहीत होते. त्यामुळे त्यांनी पीएसजी क्लबमधील खेळाडूंना आक्रमक खेळाचा सल्ला दिला. १२व्या मिनिटाला अश्रफ हकिमीने, तर २०व्या मिनिटाला डेस्सिरे डुए याने गोल केला व २-० अशी आघाडी मिलवली.

पीएसजी क्लबकडून उत्तरार्धात आणखी वेगवान खेळ करण्यात आळा. ६३व्या मिनिटाला डेसिरे डुए याना ७३व्या मिनिटाला खविचा क्वारतखेलिया याने ८६व्या मिनिटाला सेनी मायुलू याने गोल करीत पीएसजीला इंटर मिलान क्लबवर पंचातारांकित विजय मिळवून दिला.

इंटर मिलान क्लबने तीन वेळा चॅम्पियन्स लीगच्या अजिंक्यपदाची माल आपल्या गळ्यात घातली आहे. इंटर मिलानने १९६४, १९६५ व २०१० मध्ये या स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले आहे. पण गेल्या १५ वर्षामध्ये त्यांना या स्पर्धेच्या जेतेपदापासून दूर राहावे लागत आहे. २०२३ व २०२५ या दोन वर्षांमध्ये त्यांचा संघ उपविजेता राहिला आहे. दोन क्लबला मार्गदर्शन करताना चॅम्पियन्स लीगचे विजेतेपद मिळवून देणारे लुईस एनरिक हे सहावे प्रशिक्षक ठरले आहेते.

# २७ दिवसांत ५ दिग्गज खेळाडूंनी घेतली निवृत्ती

**नवी दिल्ली, दि. ३ :**

मे २०२५ मध्ये जगातील अनेक दिग्गज खेळाडूंनी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. यानंतर जूनच्या सुरुवातीला सुद्धा दोन खेळाडूंनी निवृत्तीची घोषणा केली आहे. खेळाडूंच्या या निर्णयामुळे चाहत्यांमध्ये कुठे ना कुठे निराशा आहे. (मे २०२५) मध्ये रोहित आणि विराट सारख्या दिग्गज खेळाडूंनी सुद्धा कसोटी क्रिकेटला अलविदा म्हटले. आयपीएल २०२५ नंतर सुद्धा काही खेळाडू निवृत्तीची घोषणा करू शकतात.

७ मे रोजी रोहित शर्माने कसोटी क्रिकेट सोडण्याचा निर्णय घेतला. यानंतर १५ मे रोजी विराट कोहलीने सुद्धा कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. यानंतर श्रीलंकेचा स्टार खेळाडू एंजेलो मैथ्यूजने २३ मे रोजी कसोटी क्रिकेट मधून निवृत्तीची घोषणा केली होती.



तसेच जूनच्या सुरुवातीला सुद्धा दोन दिग्गज खेळाडूंनी निवृत्तीची घोषणा केली. पहिल्यांदा ऑस्ट्रेलियाचा स्टार अष्टपैलू खेळाडू ग्लेन मॅक्सवेलने वनडे क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. यानंतर साऊथ आफ्रिकेचा यष्टीरक्षक फलंदाज हेनरिक क्लासेनने क्रिकेटच्या तीनही फॉरमॅटला सोडण्याचा निर्णय घेतला. सध्या ३३ वर्षांच्या वयामध्ये क्लासेनचा हा निर्णय चाहत्यांसाठी चिंतेचा विषय ठरला आहे. याप्रकारे २७ दिवसांच्या आतमध्ये पाच दिग्गज खेळाडूंनी क्रिकेटला अलविदा म्हटले.

असे मानले जात आहे की, आता तो दिवस दूर नाही जेव्हा भारताचे काही अनुभवी खेळाडू निवृत्तीची घोषणा करू शकतात. चेतेश्वर पुजारा आणि अजिंक्य रहाणे सुद्धा यामध्ये नाव सामील आहे. दोन्ही खेळाडू मोठ्या काळापासून टीम इंडिया पासून दूर आहेत, अशा परिस्थितीत दोन्ही खेळाडू क्रिकेटला निवृत्तीची घोषणा करू शकतात.

**२०२५ वर्षांमध्ये निवृत्ती घेणाऱ्या खेळाडूंची यादी**

- हेनरिक क्लासेन
- ग्लेन मॅक्सवेल
- विराट कोहली
- रोहित शर्मा
- स्टीव स्मिथ
- मार्कस स्टॉईनीस
- एंजेलो मैथ्थूज
- दिमुथ करूणारत्ने
- मुशफिकुर रहिम
- महमूदुल्लाह







# मॅक्सवेल एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्त

**नवी दिल्ली, दि. ३ :**

ऑस्ट्रेलियाचा स्टार अष्टपैलू खेळाडू ग्लेन मॅक्सवेलने एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याची एकदिवसीय कारकीर्द १३ वर्षांची होती. ३६ वर्षीय मॅक्सवेलने १४९ एकदिवसीय सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व केले, ३,९९० धावा केल्या आणि ७७ विकेट्स घेतल्या. त्याचा स्ट्राईक रेट १२६.७० होता. तथापि, तो सध्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळत राहील.

मॅक्सवेलने २०१२ मध्ये ऑस्ट्रेलियासाठी एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तो २०१५ आणि २०२३ चा विश्वचषक जिंकणाऱ्या संघाचाही भाग होता. २०२३ च्या विश्वचषकात अफगाणिस्तानविरुद्ध २०१ धावा केल्या.

सोमवारी निवृत्तीची घोषणा करताना मॅक्सवेल म्हणाला, मला असे वाटले की मी संघाला थोडे निराश करत आहे कारण माझे शरीर आता या स्वरुपाच्या मागण्या पूर्ण करण्याच्या स्थितीत नव्हते. मॅक्सवेलने मार्चमध्येच एकदिवसीय क्रिकेट सोडण्याचा निर्णय घेतला होता. चॅम्पियन्स ट्रॉफी दरम्यान, त्याने ऑस्ट्रेलियाचे मुख्य निवडकर्ता जॉर्ज बेली यांना सांगितले की त्याला वाटत नाही की तो २०२७ च्या विश्वचषकात खेळू शकेल.

मॅक्सवेल म्हणाला, मला वाटते की आता वेळ आली आहे की माझी जागा घेणाऱ्या खेळाडूंनी त्यासाठी नियोजन सुरू करावे. या संधीचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा आणि २०२७ च्या विश्वचषकासाठी ते स्थान तुमचे करा. आशा आहे की त्याला आधीच पुरेशा संधी मिळतील जेणेकरून तो त्या भूमिकेत यश मिळवू शकेल.

भारताविरुद्धचा चॅम्पियन्स ट्रॉफीचा उपांत्य सामना हा त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील शेवटचा सामना होता. ४ मार्च रोजी दुबईमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात मॅक्सवेल ७ धावा काढून अक्षर पटेलच्या गोलंदाजीवर बोल्ड झाला. मॅक्सवेल आयपीएल २०२५ मध्ये पंजाब किंग्जचा भाग होता पण दुखापतीमुळे तो स्पर्धेतून बाहेर पडला.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २७२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 272 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .